गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
RNI NO. MAHMAR/2023/84162
YASH SIDDHI NEWS

● वर्ष २ रे ●अंक २२ वा ●शनिवार ०८ जून २०२४ ●पाने ४ ●किंमत ४ रु/-

| * Volume 2 | Issue 22 | Date : 08/06/2024 blow Saturday Page 4 Price 4

## राज्यात पुढील पाच दिवस पावसाचे; मुंबईत अतिवृष्टीचा इशारा




**पुढील चार ते पाच दिवस राज्यात पावसाचा जोर राहील. रविवारपासून पुढील तीन दिवस मुंबईसह संपूर्ण किनारपट्टी, पश्चिम घाट, दक्षिण – मध्य महाराष्ट्रात बहुतेक ठिकाणी अतिवृष्टी होण्याचा अंदाज आहे. – माणिकराव खुळे, निवृत्त शास्त्रज्ञ, हवामान विभाग**

पुणे : राज्यात पुढील पाच दिवस पावसाचे असणार आहेत. रविवार ते मंगळवार या तीन दिवसांत किनारपट्टीसह पश्चिम घाट परिसरात अतिवृष्टी होण्याचा अंदाज आहे. प्रामुख्याने मुंबईला अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, देशात सध्या सात ठिकाणी वाऱ्याची चक्रीय स्थिती निर्माण झाली आहे. गोव्याच्या किनारपट्टीवर अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले आहे. त्यामुळे पुढील पाच दिवस राज्यात पावसाचा जोर वाढणार आहे. प्रामुख्याने किनारपट्टी आणि पश्चिम घाटाच्या परिसरातील जिल्ह्यांना नारंगी इशारा देण्यात आला आहे. रविवारपासून पुढील तीन दिवस मुंबईत पावसाचा जोर वाढणार असून, अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे.मोसमी पावसाची बंगालच्या उपसागरातील शाखा कमजोर पडली आहे. त्यामुळे तिची वाटचाल थांबली आहे. अरबी समुद्रातील शाखा वेगाने पुढे जाण्यास पोषक वातावरण आहे. पुढील चार दिवसांत मोसमी पाऊस राज्याच्या बहुतेक भागात दाखल होईल, असेही हवामान विभागाने म्हटले आहे.

दरम्यान, पुणे आणि परिसरात शुक्रवारी सकाळी तासभर पाऊस पडला. सकाळपासून आकाश ढगाळलेले राहिले.

## सोलापुरात मृगाचा पहिलाच दमदार पाऊस; ओढे, नाले वाहू लागले



सोलापूर/प्रतिनिधी : मृग नक्षत्राला सुरुवात झाल्यानंतर पहिल्याच दिवशी सोलापूर शहर व जिल्ह्यात दमदार पाऊस झाला. करमाळा, पंढरपूर, मोहोळ, माढा, सांगोला आदी तालुक्यांमध्ये पावसाचा जोर होता.यंदाच्या दुष्काळाच्या पार्श्र्वभूमीवर जिल्ह्यात बहुसंख्य गावे, वाड्यावस्त्यांमध्ये पाणीटंचाईमुळे जनतेची तहान भागविण्यासाठी २०० पेक्षा अधिक टँकरद्वारे पाणीपुरवठा होत असताना तसेच पाण्याअभावी धोक्यात आलेल्या केळी, डाळींब, पेरू आदी फळबागांसह उन्हाळी पिके वाचविण्यासाठी धडपडणाऱ्या शेतकऱ्यांना पावसाची प्रतिक्षा होती. सोलापूर जिल्ह्यासाठी वरदान ठरलेल्या उजनी धरणही तळ गाठत असल्यामुळे शेतीसह पिण्याच्या पाण्याचीही चिंता निर्माण झाली असताना सुदैवाने यंदा चालू जूनपासून पाऊस सुरू होणार असल्याच्या हवामान खात्याच्या अंदाजामुळे सर्वांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

या पार्श्र्वभूमीवर रोहिणी नक्षत्राच्या पाठोपाठ मृग नक्षत्राच्या पावसाने दमदार सुरुवात केली आहे. त्याचा पूर्व अंदाज घेऊन जिल्ह्यात शेतकऱ्यांनी खरीप हंगामात सुमारे चार लाख हेक्टर क्षेत्रांत पिकांच्या पेरण्यांसाठी तयारी हाती घेतली आहे.

मृग नक्षत्राच्या पूर्वसंध्येला गुरुवारी रात्री पावसाच्या सरी कोसळल्या. त्यामुळे रस्ते जलमय झाले होते. शेतांतही पाणी साचले असून ओढे, नाले भरून वाहू लागले आहेत. शुक्रवारी मृग नक्षत्राच्या पहिल्या दिवशी पावसाने जोमदार हजेरी लावून सर्वांना दिलासा दिला. जिल्ह्यात सरासरी ३०.६ मिलीमीटर पाऊस । **पान २ वर**

## नरेंद्र मोदी यांची भारताच्या पंतप्रधानपदी तिसऱ्यांदा नियुक्ती

### राष्ट्रपतींकडून शिक्कामोर्तब, शपथविधीचंही दिलं आमंत्रण!



नवी दिल्ली : नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेण्यास सज्ज झाले आहेत. देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना रविवारी शपथविधी सोहळ्यात पंतप्रधान पदाची शपथ घेण्यासाठी औपचारिक आमंत्रण दिलं. रविवारी ९ जून रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या शपथविधीचा सोहळा पार पडणार आहे. सार्वत्रिक लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये एनडीएला स्पष्ट बहुमत मिळाले. इंडिया आघाडीही थोड्याफार फरकाने मागे होती. त्यामुळे इंडिया आघाडीकडूनही सत्ता स्थापनेचा दावा केला जात होता. तत्पूर्वी एनडीए नेत्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन सत्ता स्थापनेचा दावा केला. त्यानंतर राष्ट्रपतींनी नरेंद्र मोदींना आमंत्रण देऊन त्यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदींची नियुक्ती केली असून ९ जून रोजी होणाऱ्या शपथविधी सोहळ्यासाठी त्यांना निमंत्रण दिलं.

आज सकाळी एनडीएच्या घटकपक्षांची बैठक झाली. या । **पान २ वर**

## उपमुख्यमंत्रिपदी कायम राहून पक्षसंघटनेसाठी काम करणार, प्रत्येक मतदारसंघापर्यंत पोहोचणार : देवेंद्र फडणवीस



नवी दिल्ली : देवेंद्र फडणवीस राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार आणि त्या ठिकाणी दुसऱ्याची वर्णी लागणार या चर्चेला आता पूर्णविराम मिळाला आहे. अमित शाहांसोबत झालेल्या भेटीनंतर मोठा निर्णय झाला असून देवेंद्र फडणवीसांच्या राजीनाम्याची विनंती फेटाळण्यात आली आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्रिपदी कायम राहून देवेंद्र फडणवीस हे आता पक्षसंघटनेसाठी काम करणार आहेत. विधानसभेची निवडणूक डोळ्यासमोर ठेऊन ते जनादेश यात्रेच्या माध्यमातून राज्यातल्या प्रत्येक मतदारसंघापर्यंत पोहोचणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.

लोकसभेच्या निकालानंतर राज्यातील भाजपमध्ये मोठा बदल होण्याची शक्यता वर्तण्यात येत होती. देवेंद्र फडणवीस जर राजीनाम्यावर ठाम राहिले तर गिरीश महाजन यांची राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदावर वर्णी लागू शकते अशीही चर्चा होती. त्यावर गिरीश महाजनांनी स्पष्टीकरण दिलं असून या निव्वळ अफवा असल्याचं त्यांनी म्हटलंय.

लोकसभेच्या निवडणुकीत राज्यातून ४५ पेक्षा जास्त खासदार निवडून आणण्याचं लक्ष असताना महायुतीला मात्र केवळ १७ जागा मिळाल्या. त्यामध्ये भाजपने राज्यात २८ जागा लढवून त्यांना फक्त ९ जागा जिंकता आल्या. तर दुसरीकडे महाविकास आघाडीने ३० जागा जिंकल्या. भाजप आणि महायुतीच्या या पराभवाची जबाबदारी स्वीकारत देवेंद्र फडणवीसांनी राजीनामा देण्याची तयारी ठेवली होती

राज्य सरकारमधून आपल्याला मुक्त करावं अशी विनंती केंद्राकडे करणार असल्याचं देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं. तसेच विधानसभेच्या निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन पक्षासाठी काम करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

देवेंद्र फडणवीस हे आज दिल्लीच्या। **पान २ वर**

## राहुल गांधी ओडिशात आले तर मी गोडसे होईल, काँग्रेसकडून तक्रार दाखल

नवी दिल्ली : काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. यानंतर ओडिशामधील काँग्रेसचे उपाध्यक्ष शिवानंद रॉय यांनी तक्रार दाखल केली आहे. काँग्रेसने दावा केला आहे की, सोशल मीडियावरून सदर धमकी मिळाली आहे. राहुल गांधी जर ओडिशात आले तर मला गोडसे व्हावे लागेल, अशी धमकी मिळाल्याचा दावा काँग्रेसने केला आहे.काँग्रेसची तक्रार सायबर पोलिसांकडे वर्ग करण्यात आली आहे. काँग्रेस प्रदेश कमिटीचे अध्यक्ष सरत पटनायक, प्रचार समितीचे अध्यक्ष भक्त चरण दास, प्रदेश सरचिटणीस आणि ओडिशाचे प्रभारी । **पान २ वर**






## १२ जूनला जागतिक बालकामगार विरोधी दिवस

सोलापूर/प्रतिनिधीः राष्ट्रीय बालहक्क संरक्षण आयोगाच्या निर्देशानुसार १२ जून हा दिवस जागतिक बालकामगार विरोधी दिन म्हणून सर्वत्र पाळण्यात येतो. जिल्ह्यातील सर्व दुकाने, हॉटेल्स, व्यापारी संस्था व कारखाने मालक यांनी १४ वर्षाखालील बालकास तसेच धोकादायक व्यवसाय व प्रक्रियेशी संबंधीत उद्योग मालकांनी बाल कामगारास कामावर ठेवू नये, असे आवाहन सहाय्यक कामगार आयुक्त सुधीर गायकवाड यांनी केले आहे. सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयामार्फत बालकामगार प्रतिबंध करण्याच्या दृष्ट्रिने जिल्हा कृति दलामार्फत जिल्ह्यात दिनांक ३० जून २०२४ पर्यंत कारखान्यांना भेटी देणे, बालकामगार प्रथा विरोधीसह्यांची मोहीम राबविणे, पोस्टर चिकटविणे, जनजागृती करणे यासाठी दलाची स्थापना करण्यात आली असून दलामार्फत आस्थापनांची तपासणी करून बालकामगार आढळून आल्यास त्यांची मुक्तता करावी व बालकामगार अधिनियमांतर्गत कार्यवाही करावी त्याचबरोबर मालक अथवा चालक यांचेकडून आस्थापनेमध्ये १४ वर्षाखालील बालकामगार काम करीत नाहीत व भविष्यातही काम करणार नाहीत याबाबत हमीपत्र संबंधितांकडून घेण्यातबाबत सुचना दिल्या. कोणत्याही कारखाना, आस्थापना, हॉटेल, गॅरेज तसेच धोकादायक उद्योग यामध्ये बालकामगार ठेवणे कायद्याने गुन्हा असून अशा ठिकाणी बालकामागार आढळल्यास त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असेही सहाय्यक कामगार आयुक्त श्री गायकवाड यांनी कळविले आहे.

## मंगळवेढा तालुक्यातील रस्त्यासाठी १८६ कोटी मंजूर : आ.आवताडे

**मंगळवेढा/प्रतिनिधी**

मंगळवेढा तालुक्यातील दक्षिण भाग वर्षानुवर्षे विकासापासून वंचित राहिला असून या भागांमध्ये उद्योगधंदे वाढवणे व शेतीच्या पाण्याची सोय करणे हे प्रमुख काम डोळ्यासमोर ठेवून मी अहोरात्र काम करत आहे, या भागात उद्योग वाढवायचे असतील तर पहिल्यांदा व्यवस्थित दळणवळणाची सोय झाली पाहिजे तरच उद्योगधंदे फायदेशीर ठरत असतात ही गोष्ट डोळ्यासमोर ठेवून १८६ कोटी २१ लाख रुपयाचा तालुक्याच्या दक्षिण भागातून पूर्व पश्चिम महामार्गाला जोडणारा ४४ किमीचा सिमेंट रस्ता मंजूर केला केला असून या रस्त्यामुळे या भागात महामार्गाला पोहोचण्यासाठी जवळचा सोयीस्कर मार्ग होणार असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून पंढरपूर मतदार संघामध्ये मोठ्या प्रमाणात विकास कामासाठी निधी मिळविला आहे नुकतेच बांधकाम मंत्री रविंद्र चव्हाण यांचे कडून महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ मर्यादित योजनेअंतर्गत मंद्रूप-निंबर्गी-भंडारकवठे-कर्जाळ-कात्राळ-हुलजंती-पौट-निंबोणी-नंदेश्र्वर-गोणेवाडी-लेंडवेचिंचाळे ते राष्ट्रीय महामार्ग १६६ ला जोडणारा रस्ता ४४ किलोमीटर अंतराचा सिमेंट रस्ता मंजूर झाला आहे त्यामुळे दोन्ही महामार्गाला जोडणाऱ्या या रस्त्यामुळे या भागातील दळणवळणास चालना मिळणार आहे सदरील रस्ता दहा मीटर रुंदी ने होणार असून या रस्त्यावर पूल बांधणे, पाईपच्या मो-या करणे अशी कामे समाविष्ट आहेत. तरी लवकरच या रस्त्याच्या कामाची निविदा निघून कामास सुरुवात होणार असून ३५ गाव पाणीपुरवठा योजनेच्या मंजुरीनंतर या भागात दुसरा मोठा निधी मंजूर झाला असल्याची माहिती आमदार समाधान आवताडे यांनी दिली.

## देवळाली येथील टायर रिमोल्डिंगच्या दुकानाला आग

### वीज कोसळल्यामुळे घडली दुर्घटना, लाखो रुपयांचे नुकसान



**करमाळा/प्रतिनिधी**

देवळाली येथील समर्थ टायर रिमोल्डिंग या दुकानावर दि. ६ जुनच्या मध्यरात्री १२.३० च्या दरम्यान पाऊस सुरु असताना, अचानक वीज कोसळल्यामुळे दुकानामध्ये असलेले साधारणतः पाच लाख रुपयांच्या आसपासचे टायर तयार करण्याचे रबरी साहित्य तसेच बनविलेले टायर जळून खाक झाले आहेत. सदरच्या घटनेविषयी अधिक माहिती देत असताना टायर विक्रेते सचिन कानगुडे यांनी सांगितले कि, दररोजच्या प्रमाणे दुकानातील कामगारांनी काम आटोपल्यानंतर दुकान व्यवस्थित बंद करुन, आम्ही सर्वजण पाऊस मोठा सुरु असल्यामुळे घरी गेलो होतो. परंतु निसर्गाची अवकृपा झाली आणि वीज थेट आमच्या दुकानावर आदळली. दुकानामध्ये टायर बनविण्याच्या ज्वलनशील पदार्थामुळे दुकानात इतर वस्तुनी लगेच पेट घेतला असल्याचा यावेळी प्राथमिक अंदाज वर्तविण्यात येत आहे.

देवळाली येथील समर्थ टायर रिमोल्डिंग हे वर्क शॉप करमाळा-टेंभुर्णी हायवे लगत आहे. दुकानातुन मोठ्या प्रमाणात धूर व आगीच्या ज्वाला बाहेर पडत असताना, महामार्गावरुन ये-जा करणाय़ा वाहतुकदारांनी शेजारी। **पान २ वर**

## संपादकीय

### परिवर्तन होण्याचे संकेत

ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी या निकालातून आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील परिवर्तनाचे संकेत मिळत आहेत, अशा प्रकारची प्रतिक्रिया दिल्यामुळे लोकसभा निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाल्यानंतर महाराष्ट्र विधानसभेची चर्चाही आता सुरू झाली आहे. लोकसभेच्या निवडणुकीनंतर सहा महिन्यांच्या कालावधीतच महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक होते आणि गेल्या काही वर्षांमध्ये झालेल्या या दोन्हीही निवडणुकांवर नजर टाकली तर लोकसभा आणि विधानसभेसाठी राज्यातील मतदार कशा प्रकारचे कौल देतात हे स्पष्ट होते. २०१४ मध्ये लोकसभा निवडणुकीनंतर नरेंद्र मोदी यांचे सरकार केंद्रात सत्तारूढ झाले. त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुकीमध्ये भाजप आणि शिवसेना यांचे सरकार महाराष्ट्रात सत्तेवर आले. २०१९ च्या निवडणुकीमध्येसुध्दा मोदी सरकारने केंद्रात सत्ता मिळवल्यानंतर महाराष्ट्रामध्ये पुन्हा एकदा मतदारांनी भाजप आणि शिवसेना यांना एकत्रित कौल दिला होता. पण त्यावेळी वाटाघाटी बिनसल्यामुळे उध्दव ठाकरे यांनी वेगळी वाट धरली. आता २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत राज्यामध्ये भाजप आणि त्यांचे नवीन दोन मित्र पक्ष एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवारांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष या सर्वांना मतदारांनी जोरदार धक्का दिला आहे. महाराष्ट्रातील ४८ मतदारसंघांचा विचार करता सध्या महाविकास आघाडीला ३०, महायुतीला १७ जागा मिळाल्याचे दिसते. एक अपक्ष सांगलीतील विशाल पाटील हे तसे महाविकास आघाडीचेच आहेत. राज्यातील सध्याचे संख्याबळ ३१ विरुध्द १७ असे आहे. एका लोकसभा मतदारसंघामध्ये सहा विधानसभेचे मतदारसंघ असतात. सध्याच्या कौलाच्या आधारे २८८ मतदारसंघामध्ये महाविकास आघाडी १८० च्या आसपास पोहोचू शकते, तर १७ जागांचा विचार करता महायुती मात्र साधारण शंभर जागांच्या आसपास पोहोचू शकते. अर्थात हा सर्वसाधारण अंदाज आहे. एका लोकसभा मतदारसंघामध्ये सहा विधानसभा मतदारसंघ असले तरी नवडून आलेल्या खासदाराला सहाच्या सहा विधानसभा मतदारसंघांचा पाठिंबा असतो असेही नाही. प्रत्येक विधानसभा मतदारसंघामध्ये मतदारांचा कौल कमी जास्त असतोच. तरीही पवार यांनी म्हटल्याप्रमाणे या लोकसभा निवडणुकीच्या निकालाने महाराष्ट्र विधानसभेमध्येसुध्दा परिवर्तन होण्याचे संकेत दिले आहेत. एकूणच महाविकास आघाडीला यशाचे सातत्य टिकवण्यासाठी काम करावे लागणार आहे

# आंबडकरी राजकीय पक्षात..

आंबेडकरी राजकीय पक्षात गेल्या ३०,४० वर्षात दुसऱ्या, तिसऱ्या फळीतील अनेक कार्यकर्त्यांना पुढे येऊ दिले नाहीत पक्ष one man Army चालविला आहे असे दिसते यामुळे आंबेडकरी राजकीय पक्षाची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. आणि हे पक्ष एकाच जाती पुरते मर्यादित राहिले अशीच प्रतिमा तयार झाली. आंबेडकरवादी विचाराचे अन्य जातीतील नेत्यांना नेतृत्व करण्याची संधी पण यांनी दिली नाही मग पक्ष कसा वाढेल? आता गरज आहे ती आत्मचिंतन करण्याची पण हे काम होताना दिसत नाही. पक्षाचे काम करणाऱ्यांना तिकिटे दिली जात नाहीत दुसऱ्या पक्षात तिकीट मिळाले नाही म्हणून आपल्या कडे येनाऱ्याला तिकीट देणे, पैसा खर्च करण्याची क्षमता पाहून तिकीट देणे ,यामुळे कार्यकर्ते दुरावले जतात. आज जगातला श्रीमंत पक्ष भाजपा सुद्धा आयात कार्यकर्त्यांना संधी दिली त्यामूळे त्यांचे सुद्धा कसे नुकसान झाले आहे हे आपण पहात आहोत. पण आपण कधी हा विचार केलाच नाही तर आपल्या सर्व पक्षाचे भवितव्य अंधारात आहे याची कधीतरी समीक्षा होणे गरजेचे आहे. जमिनीवर येऊन काम करण्याची गरज आहे असे वाटते. आज पर्यंत ज्यांनी नेतृत्व केले आहे. आहे ती प्रचंड ताकतीचे नेते आहेत. त्यांनी प्रचंड काम केले आहे .त्यांचा त्याग मोठा आहे. त्यांच्या बद्दल प्रचंड आदर आहे. पण त्यांच्या कडून अनेक अपेक्षा आहेत. त्यांनी नव्याने कामाची रणनीती आखणे ही तेवढेच आवश्यक आहे.

एक कार्यकर्ता म्हणून मला असे वाटते की कार्यकर्त्या बरोबर बोलावे, नवीन लोकांना संधी द्यावी. बूथ बांधणी करावी, शाखा बांधणी करावी सर्वात महत्वाचे कामात सातत्य ठेवावे कार्यकर्त्यांचा उत्साह वाढवावा. त्याला दिलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी त्याला विहीत कालावधी द्यावा . त्याच्या कामाचा परफॉर्मन्स तपासावा आणि काम करणाऱ्याला तिकीटे द्यावी. म्हणजे पक्ष वाढण्यास मदत होईल अचानक कुठला तरी माणूस आणून कार्यकर्त्यावर लादु नये .लोकांचे जीवन मरणाचे प्रश्न हातात घेऊन काम झाले पाहिजे. सामान्य कष्टकरी, शेतकरी, महीला, बेरोजगारी, महागाई या प्रश्नावर सतत आवाज उठविला पाहिजे. राजकीय पक्ष म्हणून काम करताना सर्व निवडणुका या ताकदीने लढविने गरजेचे आहे. सध्या अनेक पक्ष त्यांच्या सोईसाठी आपण निवडणूक लढवावी असे वाटणारे आहेत. पण आपला कोणाला तरी फायदा किंवा कोणाला तरी तोटा होतो आहे. अशी प्रतिमा आपल्या सर्वच पक्षाची झाली आहे असे दिसते ही प्रतिमा पुसुन टाकण्यासाठी चांगले नेतृत्व निर्माण करावे लागते. राजकीय प्रशिक्षणाची कार्यकर्त्यांना गरज आहे. निश्चित ध्येय ठेवून त्यासाठी रणनिती ठरविणे गरजेचे आहे. आपल्या पक्षाचा उमेदवार हे आधी ठरवून त्याला कामाला लावणे पक्षाच्या हिताचे ठरेल . आता पार पडलेल्या लोक सभेच्या निवडणुका यात आंबेडकरवादी पक्षांची अत्यंत वाईट अवस्था झाली हे आपण पहात आहोत याच्या कारणांची आपण समीक्षा केली पाहिजे. कोणते मुद्दे घेऊन आपण जनतेत गेलो. मागील पाच वर्षात आपण पक्ष वाढीसाठी किती काम केले. याचा आढावा घेणे व पुढील वाटचलीसाठी कोणते मुद्दे घेऊन आपण काम करणार हे ठरविणे ही गरजेचे आहे. फक्त निवडणुका आल्या की तेवढ्या पुरते काम न करता मागील निवडणूकीत जे उमेदवार थोड्या फार फरकाने पडले असतील तर त्याला पुन्हा तिकिट देऊन पुढील निवडणूकीत तो कसा जिंकेल यावर पण लक्ष देणे गरजेचे आहे पण आपण प्रत्येक वेळी नवीन चेहरा समोर आणत असू तर लोकांचा पक्षावर विश्वास बसणार नाही. आयात उमेदवाराचा भूतकाळ तपासला जावा तो कोण आहे. पक्ष वाढीसाठी त्याचे काय योगदान आहे. धन दांडगा, जात दांडगा पाहून तिकीट देणे आता कालबाह्य होत चालले आहे हे आता झालेल्या निवडणूकीतून दिसून आले आहे धनशक्ती विरुद्ध जनशक्ती यशस्वी होताना दिसते आहे या सर्व बाबी आंबेडकरी राजकिय पक्षाने आता विचारात घेतले पाहिजे. भावनिक पातळीवर आपण फार काळ टिकून राहणार नाही याची जाणीव होणे महत्वाचे आहे असे मला वाटते.

**मारुती बनसोडे**
**परिवर्तन , नळदुर्ग**
**मो.९५९५१७१८६६**

पान १ वरुन

### नरेंद्र मोदी यांची भारताच्या

बैठकीत नरेंद्र मोदी यांची संसदीय नेतेपदी नियुक्ती करण्यात आली. एनडीएच्या शिष्टमंडळाने अध्यक्ष द्रौपदी मुर्मू यांची भेट घेतली आणि नरेंद्र मोदी यांची भाजपच्या संसदीय पक्षाचे नेते म्हणून निवड झाल्याचे पत्र राष्ट्रपतींना सुपूर्द करण्यात आले. एनडीएच्या घटक पक्षांची पाठिंब्याची पत्रेही राष्ट्रपतींना देण्यात आली.

एनडीएचे पत्र मिळाल्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी नरेंद्र मोदींना बोलावून त्यांना पंतप्रधान पदी नियुक्ती केल्याचे पत्र दिले. तसंच, केंद्रीय मंत्रिमंडळ स्थापन करण्याचे आदेश दिले असून शपथविधी सोहळ्याबाबत माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पंतप्रधान पदासाठी तिसऱ्यांदा नियुक्ती झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, एनडीएची बैठक झाली होती. एनडीएच्या सर्व मित्रांनी मला पुन्हा एकदा या दायित्वासाठी पसंती दिली आहे. एनडीएच्या घटकपक्षांनी याबाबत राष्ट्रपतींना माहिती दिली. त्यानुसार, राष्ट्रपतींनी मला आता बोलावलं होतं. मला पंतप्रधान पदाच्या रुपाने नियुक्ती दिली आहे. मला शपथविधीसाठी आणि मंत्रिपदाच्या यादीसाठी त्यांनी सूचित केलं आहे.

सुवर्ण महोत्सवासाठी १८ वी लोकसभा महत्त्वाची ठरेल

स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानंतरची ही पहिलीच निवडणूक होती. आता २५ वर्षे आहेत जी अमृत वर्षाची २५ वर्षे आहेत. २०४७ साली देश स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव साजरा करत असेल. या सुवर्ण महोत्सवात आपल्या देशाची स्वप्न पूर्ण झालेली असतील. त्यासाठी ही १८ वी लोकसभा महत्त्वाची ठरणार आहे. एनडीए सरकारला तीनवेळा देशाची सेवा करण्याचा आदेश देशवासियांनी दिला आहे. मी देशातील नागरिकांचं पुन्हा एकदा आभार व्यक्त करतो. मी देशातील नागरिकांना विश्वास देतो की, गेल्या दोन टर्ममध्ये ज्या गतीने देश पुढे गेला आहे, समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात परिवर्तन स्वच्छपणे दिसून येतोय. २५ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढलं आहे, ही प्रत्येक भारतीयांसाठी गर्वाची बाब आहे, असं नरेंद्र मोदी म्हणाले.

### सोलापुरात मृगाचा पहिलाच

झाला असून सर्वाधिक ६१.८ मिमी पाऊस करमाळा तालुक्यात बरसल्याने तेथे चैतन्याचे वातावरण दिसून आले. पंढरपुरातही ५३.६ मिमी पाऊस झाल्याने तेथे मोठी धांदल उडाली. माढा-४९.२, सांगोला-३६.२, माळशिरस-२८.६, मंगळवेढा-१९.१ आणि बार्शी-१९.१ याप्रमाणे बहुसंख्य तालुक्यांमध्ये पावसाच्या सरी कोसळल्या. त्या तुलनेने उत्तर सोलापूर (८.३), दक्षिण सोलापूर (४.३) आणि अक्कलकोट (३.१) येथे कमी पाऊस झाला. आठवडाभर जिल्ह्यात सरासरी ६१.१ मिमी पाऊस झाला असून यात सर्वाधिक ११५ मिमी पाऊस करमाळ्यात पडला आहे.

करमाळा तालुक्यात पावसाचा जोर वाढला असतानाच देवळाली गावात एका टायर रिमोल्डिंग कारखान्यावर वीज कोसळली. यात संपूर्ण कारखाना जळून गेल्याने सुमारे पाच लाख रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सचिन अरूण कानगुडे यांच्या मालकीचा हा कारखाना करमाळा-जेऊर रस्त्यावर देवळाली येथे आहे. शुक्रवारी पहाटे पाऊस पडत असतानाच कारखान्यावर वीज कोसळली.

### उपमुख्यमंत्रिपदी कायम राहून

दौऱ्यावर आहेत. राष्ट्रवादीचे खासदार प्रफुल्ल पटेल यांच्या निवासस्थानी अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. त्यामध्ये या दोन नेत्यांनी फडणवीसांनी सरकारमध्येच राहावं यासाठी मनधरणी केल्याची माहिती आहे.त्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या दोन नेत्यांमध्ये सुमारे अर्धा तास चर्चा झाली असून चर्चेचा तपशील मात्र मिळाला नाही. पुढच्या चार महिन्यात विधानसभा निवडणुका आहेत. पक्ष संघटनेमध्ये काम करून ती बळकट करण्याचा मानस देवेंद्र फडणवीसांचा आहे. त्यामुळे आपल्याला सरकारमधून मोकळं करा असा आग्रह फडणवीसांनी केंद्रीय नेतृत्वाकडे केल्याची माहिती आहे. मात्र ही मागणी अमित शाहांनी फेटाळली आहे.

राज्यातील आगामी विधानसभा निवडणूक लक्षात घेता जनादेश यात्रा काढण्याचा देवेंद्र फडणवीसांचा निश्चय आहे. त्या माध्यमातून प्रत्येक मतदारसंघातील मतदारांपर्यंत पोहोचण्याचाही प्रयत्न आहे.

### राहुल गांधी ओडिशात आले..

डॉ. अजय कुमार यांनी सायबर पोलिसांना तक्रारीचे पत्र देऊन यासंबंधी कारवाई करण्याची मागणी केली.

काँग्रेस नेत्यांनी पत्रात लिहिले की, भारत सिनेमा या एक्स हँडलवरून राहुल गांधी यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे. या हँडलने कॅप्शन लिहिले, काँग्रेस ओडिशात कधीच येऊ शकत नाही. जर भविष्यात कधी राहुल गांधी ओडिशात आले तर मला नथुराम गोडसे व्हावे लागेल. यापुढे राहुल गांधी यांच्या आयडीला टॅग करून समझे पप्पू, अशी धमकी देण्यात आली आहे.ओडिशा काँग्रेसने आपल्या तक्रारीत म्हटले की, सदर हँडलवरून राहुल गांधी यांचे फोटोही जोडण्यात आले आहेत. यातून हे स्पष्ट होते की, सदर हँडलचा वापरकर्ता उघड उघड राहुल गांधी यांना जिवे मारण्याची धमकी देत आहे. इतिहासात नथुराम गोडसेने महात्मा गांधी यांची हत्या केली होती. कट्टरतावादी विचारातून त्याने ही हत्या केली. त्याचप्रमाणे आता राहुल गांधी यांना धमकी देण्यात येत आहे. त्यामुळे आमची विनंती आहे की, याबाबत पोलिसांनी कडक कारवाई करावी.सदर एक्स युजर आणि त्याच्या पोस्टची न्यायवैद्यकशास्त्र विभागातर्फे चौकशी करावी आणि आरोपीच्या विरोधात कडक कारवाई करण्याची विनंती काँग्रेसने केली आहे. ओडिशा शांतताप्रिय राज्य आहे. इथे अनेक पक्षांचे सरकार आले आणि गेले. पण या प्रकरणाची चौकशी व्हावी.

### देवळाली येथील टायर

असरणाऱ्या हॉटेल मालकाला सदरच्या घटनेची माहिती दिली. यानंतर हॉटेल मालकाकडून सचिन कानगुडे यांना दुकानाच्या दुर्घटनेची माहिती मिळाली. व यानंतर अग्निशामक गाडी बोलावून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# रशियामध्ये नदीत बुडून ४ भारतीय विद्यार्थ्यांचा मृत्यू; मित्राला वाचवताना घडली दुर्घटना

रशियात चार भारतीय विद्यार्थ्यांचा नदीत बुडून मृत्यू झाला असल्याची घटना समोर आली आहे. हे चारही विद्यार्थी भारतातील असून रशियामधील यारोस्लाव-द-वाईज नोव्हगोरोड स्टेट युनिव्हर्सिटीमध्ये वैद्यकीय शिक्षण घेत होते. सेंट पीटर्सबर्गच्या जवळील एका नदीच्या काठावर हे विद्यार्थी सायंकाळच्या वेळेला फिरण्यासाठी गेले असता तेथे एका मित्राला वाचवताना ४ भारतीय विद्यार्थ्यांचा बुडून मृत्यू झाला आहे.वृत्तानुसार, एकजण नदीमध्ये उतरला होता. मात्र, तो नदीत बुडायला लागल्यामुळे त्याला मदत करण्यासाठी गेलेल्या विद्यार्थ्यांचाही बुडून मृत्यू झाला आहे. यापैकी एकाचा मृतदेह बाहेर काढण्यात आला असून उर्वरित तिघांचा शोध सुरू आहे. दरम्यान, हे सर्व विद्यार्थी महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यातील असल्याची माहिती सांगण्यात आली आहे.

दरम्यान, या विद्यार्थ्यांचे मृतदेह लवकरात लवकर भारतात आणले जाणार आहेत. जळगाव येथील अधिकाऱ्यांकडून रशियातील स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधण्यात येत आहे. तसेच भारतीय दूतावासाच्या माध्यमातून रशियन अधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात येत असल्याची माहिती सांगण्यात येत आहे. या घटनेत एक विद्यार्थीनीही नदीत पडली होती. मात्र, तिला वाचवण्यास यश आलं असून तिच्यावर उपचार सुरु आहेत.

या घटनेबाबत जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी या घटनेसंदर्भात पुष्टी केली असल्याचे वृत्त इंडिया टुडेनी दिले आहे. हर्षल देसले, जिशान पिंजारी, जिया पिंजारी, या घटनेत मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांची नावे आहेत. हे विद्यार्थी रशियाच्या यारोस्लाव-द-वाईज नोव्हगोरोड स्टेट युनिव्हर्सिटीमध्ये घेत होते.दरम्यान, ही घटना ४ जून रोजी संध्याकाळी सेंट पीटर्सबर्ग जवळ असलेल्या नदीत ही घटना घडली आहे. ही घटना घडल्यानंतर रशिया येथील प्रशासन आणि पोलिसांबतीने भारतीय दूतावासाला या घटनेबाबत कळवण्यात आलं आहे. या विद्यार्थ्यांच्या मृत्यूमुळे त्यांच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे. यातील हर्षल देसले या विद्यार्थ्यांचा मृतदेह भारतात पाठवण्यासाठी प्रक्रिया सुरू आहे.

# मविआत काँग्रेस मोठा भाऊ', पटोलेंच्या विधानावर राऊतांचं प्रत्युत्तर; म्हणाले, कोणीही लहान आणि मोठं नाही, जो जिंकेल

मुंबई : लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला बहुमत मिळाले आहे. भारतीय जनता पार्टीला २४० जागा मिळाल्या आहेत. तर एनडीएला मिळून २९३ जागा मिळाल्या आहेत. इंडिया आघाडीला २३२ जागा मिळाल्या आहेत. महाराष्ट्रात महाविकास आघाडीने जोरदार मुसंडी मारत तब्बल ३० जागा मिळवल्या. यामध्ये काँग्रेस पक्षाला सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे काँग्रेसच्या गटात आनंदाचं वातावरण आहे.



या पार्श्वभूमीवर बोलताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी माध्यमांशी बोलताना काँग्रेस मोठा भाऊ ठरला असल्याचं म्हटलं होतं. त्यांच्या या विधानानंतर आता ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी सूचक विधान करत काँग्रेसला इशारा दिला आहे. तसंच विधानसभेचा महाविकास आघाडीचा फॉर्म्युला कसा असेल? यासंदर्भातही सूचक भाष्य केलं आहे.

कोणीही लहान आणि कोणीही मोठा भाऊ नाही. महाराष्ट्रात शिवसेना एक महत्त्वाचा पक्ष आहे आणि यापुढेही राहील. आम्ही अत्यंत संघर्षातून आणि संकटातून पक्ष उभा केला आहे. लोकसभा निवडणुकीत जागा लढवल्या आहेत. काँग्रेससमोर तसं संकट नव्हतं. त्यांचं चिन्ह आणि पक्ष हा त्यांच्याकडे होतं. आम्ही महाराष्ट्रात प्रत्येकाला मदत केली आहे. आता पुढे महाराष्ट्रात जो जिंकेल त्याची जागा, असं ठरलं आहे, असं संजय राऊत यांनी सांगितलं.आम्ही लोकसभा निवडणुकीतदेखील मोठ्या भावाची भूमिका निभावली. काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष आहे. आमच्याबरोबर असलेले आधी गट होते आता पक्ष झाले आहेत. महाराष्ट्रात आमचा जेव्हा एक खासदार होता, तेव्हाही आम्ही मोठ्या भावाची भूमिका निभावली आहे. आजही निभावत आहोत. मात्र, लहान भावांनी लहान भावासारखं वागावं, असा खोचक टोला नाना पटोले यांनी लगावला होता. त्यावर आज संजय राऊत यांनी सूचक भाष्य केलं.

राज्यात जनतेने लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला कौल दिला आहे. तब्बल ३० जागा या महाविकास आघाडीच्या पारड्यात जनतेने टाकल्या आहेत. लोकसभा निवडणुकीच्या निकालात काँग्रेस मोठा भाऊ ठरला आहे. त्यामुळे काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी चांगलाच जल्लोष केला. अशातच काँग्रेसच्या काही पदाधिकाऱ्यांनी नाना पटोले यांचा भावी मुख्यमंत्री असा उल्लेख असलेले बॅनर लावले होते. त्यामुळे या बॅनरची राज्यात चांगलीच चर्चा झाली. दरम्यान, महाराष्ट्रात काही दिवसांत विधानसभेच्या निवडणुका जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाविकास आघाडीला लोकसभेत यश मिळाल्यानंतर आता विधानसभेकडे लक्ष लागले आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचा विधानसभेचा फॉर्म्युला काय असेल? याबाबत जी जागा जो जिंकेल, ती त्याची असं म्हणत सूचक राऊतांनी केलं आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७ ते ८ जून रोजी यलो अलर्ट, तर ९ ते ११ जूनदरम्यान ऑरेंज अलर्ट

**सिंधुदुर्गनगरी**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात ७ ते ८ जून २०२४ रोजी यलो अलर्ट तर दि. ९ ते ११ जून २०२४ रोजी ऑरेंज अलर्ट असल्याचे प्रादेशिक हवामान विभागाने कळविले आहे.

जिल्ह्यात दि. ७ व ८ जून २०२४ या कालावधीत गडगडाट होऊन पाऊस पडण्याची व वीजा चमकण्याची शक्यता आहे. तसेच दि. ७ जून रोजी ५० ते ६० किमी प्रती तास वेगाने वारे वाहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. तसेच दि. ९ ते ११ जून या कालावधीत मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. त्यामुळे या कालावधीत नागरिकांनी पुढीलप्रमाणे दक्षता घेण्याचे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मच्छिंद्र सुकटे यांनी केले आहे.

या कालावधीत वीजा चमकत असताना पुढीलप्रमाणे दक्षता घेण्यात यावीविजा चमकत असताना संगणक, टीव्ही इत्यादी विद्युत उपकरणे बंद ठेवून स्रोतांपासून अलग करून ठेवावीत. दूरध्वनी, भ्रमणध्वनी चा वापर टाळावा. विजा चमकत असताना नागरिकांनी घराबाहेर पडू नये. घराबाहेर असल्यास सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. विजेच्या खांबांपासून लांब रहावे. विजा चमकत असताना उंच झाडाखाली आश्रयास थांबू नये. विजा चमकत असताना एखाद्या मोकळ्या परिसरात असल्यास, गुडघ्यामध्ये डोके घालून वाकून बसावे. धातूच्या वस्तू दूर ठेवाव्यात. वीज पडण्याची पूर्वसूचना मिळण्याकरिता आपल्या मोबाईल वर 'दामिनी –झज' डाऊनलोड करून घ्यावे. पाऊस पडत असताना विजा चमकत असल्यास नागरिकांनी झाडाखाली उभे राहू नये, मोबाईलवर संभाषण करू नये आणि इलेक्ट्रिक वस्तूंपासून दुर रहावे. अशा परिस्थितीत पक्के घर किंवा इमारतीत आसरा घ्यावा. कुठल्याही प्रकारच्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये मदतीसाठी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा.

नियंत्रण कक्ष व संपर्क क्रमांक पुढीलप्रमाणे जिल्हा नियंत्रण कक्ष – ०२३६२–२२८८४७ किंवा टोल फ्री १०७७, ७४९८०६७८३५. पोलीस नियंत्रण कक्ष– ०२३६२–२२८६१४ पोलीस टोल फ्री हेल्पलाईन–११२, दोडामार्ग तालुका नियंत्रण कक्ष– ०२३६३–२५६५१८, सावंतवाडी तालुका नियंत्रण कक्ष– ०२३६३–२७२०२८, वेंगुला तालुका नियंत्रण कक्ष– ०२३६६–२६२०५३, कुडाळ तालुका नियंत्रण कक्ष– ०२३६२–२२२५२५, मालवण तालुका नियंत्रण कक्ष– ०२३६५–२५२०४५, कणकवली तालुका नियंत्रण कक्ष– ०२३६७–२३२०२५, देवगड तालुका नियंत्रण कक्ष– ०२३६४–२६२२०४, वैभववाडी तालुका नियंत्रण कक्ष– ०२३६७–२३७३९ या प्रमाणे नियंत्रण कक्षाचे संपर्क क्रमाक आहे.हवामानाची माहिती भारतीय हवामान खात्याच्या https://mausam.imd.gov.in/mumbai/mcdata/district.pdf या संकेतस्थळावरून घ्या. कुठल्याही अफवांवर विश्वास ठेवू नका व अफवा पसरवू नका. कुठल्याही मिळालेल्या बातमीची खात्री अधिकृत सूत्रांकडून करून घ्या किंवा जिल्हा नियंत्रण कक्ष ०२३६२–२२८८४७ किंवा टोल फ्री १०७७ किंवा पोलीस हेल्पलाईन क्रमांक ११२ वर संपर्क करा. हवामान विभागाकडून दिलेल्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आपल्या जीवित व मालमत्तेची काळजी घ्यावी.

## शासकीय वसतिगृहात मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आवाहन

सोलापूर/प्रतिनिधीः बार्शी येथील मागासवर्गीय मुलांच्या वसतीगृहांमध्ये सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षात प्रवेश प्रक्रीया सुरु झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांनी वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज सादर करावेत असे आवाहन वसतिगृहाचे गृहपाल के.ए. सारंगकर यांनी केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गुणवंत मुलांचे शासकिय वसतिगृह नवीन, गाडेगांव रोड, आयटीआय कॉलेज समोर म्हाडा कॉलनी , बार्शी, ता. बार्शी तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह जुने,गाडेगाव रोड, आयटीआय कॉलेजवळ,बार्शी या वसतिगृहाची सन. २०२४–२५ या शैक्षणिक वर्षाची वसतिगृह प्रवेश प्रकिया सुरु करण्यात आलेली आहे. प्रवेशासाठी विनामुल्य अर्ज वाटप वसतिगृहावर दि. ०५जून २०२४ पासुन सुरु झालेले आहेत. वसतिगृहात प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेष, निर्वाह भत्ता, वसतिगृहामध्ये राहण्याची, नाष्टा व दोन वेळेच्या जेवणाची सोय मोफत करण्यात येते. तरी इच्छुक गरजु व पात्र विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा. असे आवाहनही वसतिगृहाचे गृहपाल के.ए. सारंगकर यांनी केले आहे.

## खवणीत साडेपाच हजार वृक्ष लागवडीचा संकल्प



मोहोळ/प्रतिनिधीः जागतिक पर्यावरण दिनानिमित्त खवणी येथे वृक्ष लागवड करण्यात आली. या गावातील प्रत्येक कुटुंब पाच झाडे लावणार आहे. येथे ५ हजार ५०० वृक्ष लागवडीचा संकल्प करण्यात आला आहे. यामध्ये गावठाण हद्दीत बिरोबा मंदिर परिसर तसेच इतर मोकळ्या जागेत ही झाडे लावण्यात येणार असून मोहोळचे पोलीस निरीक्षक सुरेशकुमार राऊत यांच्या हस्ते पहिले झाड लावून या मोहिमेस सुरुवात करण्यात आली. गावच्या या उपक्रमाचे पोलीस निरीक्षक राऊत यांनी स्वागत केले. यावेळी वृक्षामित्र सुदाम वसेकर, खवणी गावचे सरपंच शीतल यमगर, ग्रा.सदस्य सतीश खिलारे, पोलीस पाटील अजित भोसले, तंटामुक्त अध्यक्ष तुकाराम भोसले, ग्रामसेवक शरद सोनवणे, युवा उद्योजक धनंजय गुंड, सूर्यकांत भोसले, समाधान भोसले, सुग्रीव भोसले, शशिकांत भोसले, सचिन शिंदे, अतुल भोसले उपस्थित होते.

## सायबर कॉमिक बुकचे पालकमंत्री शंभुराज देसाई यांच्या हस्ते अनावरण



**सातारा/प्रतिनिधी**

सध्या मोबाईल, संगणक, ऑनलाईन बँकिंग, सोशल नेटवर्किंग साईट, इत्यादी गोष्टींचा वापर युवा पिढीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढलेला असून मोबाईल, टॅब, संगणक व इंटरनेट हे व्यक्तीचे दैनंदिन जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. मोबाईलमधील वेगवेगळ्या ॲप्लीकेशच्या माध्यमातुन विविध ॲपसद्वारे सायबर गुन्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे. सायबर गुन्ह्यांमध्ये फेसबुक, इंस्टाग्राम, टेलीग्राम, शेअरचॅट, ट्विटर अशा सोशल नेटवर्किंग साईटचा वापर करून व्यक्तींची बदनामी करणे, आर्थिक फसवणूक केली जात आहे. तसेच सोशल मिडीयावरुन फिशींग, आयडेंटीटी थ्रेड, रैमसनवेअर अटॅक, हॅकिंग, सायबर स्कॅमस, सायबर बुलींग, स्टाकिंग, सॉफ्टवेअर पायरसी, सोशस मिडीया फ्रॉडस, ऑनलाईन ड्रग ट्रफिकिंग, इलेक्ट्रॉनिक मनी लॉन्डरींग, सायबर इक्स्टॉर्शन, ऑनलाईन रिक्रूटमेंट फ्रॉडस, इत्यादी प्रकारचे सायबर गुन्हे सध्या समाजामध्ये घडत आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात पोलिस विभागाकडील विविध विषयांचा आढावा घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकी प्रसंगी या पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधिक्षक समीर शेख, अप्पर पोलीस अधिक्षक आँचल दलाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता संतोष रोकडे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, महिला व बाल विकास अधिकारी विजय तावरे, यांच्यासह विविध यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते. याबाबत जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या सायबर कॉमिक बुकचे अनावरण पालकमंत्री शंभुराज देसाई यांच्याहस्ते झाले.सायबर गुन्ह्यांबाबत जागरुकता करण्याकरीता ०१ जुलै २०२४ पासून सातारा जिल्हा पोलीस दल व जिल्हा परिषद सातारा यांच्या संयुक्त विद्यमानाने सातारा जिल्ह्यातील जिल्हा परिषद अंतर्गत व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील इयत्ता ६ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांमध्ये सायबर जागरुकता वाढविण्याकरीता सायबर जागरुकता अभियान राबविण्यात येणार आहे.

यामध्ये सातारा जिल्हयातील सर्व शाळांमध्ये सायबर जागरुकता निर्माण करण्याकरीता सातारा जिल्हा पोलीस दलाकडून सायबर जागरुकतेसंबंधी सर्व सामग्री पुरविण्यात येणार आहे. यामध्ये इयत्ता ६ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांमध्ये सदरसामग्रीचा वापर करुन १ जुलै २०२४ ते ३१ जुलै २०२४ या कालावधीमध्ये जिल्हयातील सर्व शाळांमध्ये सायबर जागरुकतेबाबत प्रशिक्षण देण्यात येणार असून प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात येईल व या परिक्षेमधून ज्या विद्यार्थ्यांना (१ मुलगा १ मुलगी) चांगले गुण मिळतील त्यांना त्याच शाळेचे सायबर ॲम्बेसीडर म्हणून निवडण्यात येईल व त्यांचे मनोबल वाढविणेकरीता ऑगस्ट २०२४ चे पहिल्या आठवडयामध्ये त्यांचा सत्कार घेण्यात येणार आहे. सदर उपक्रमाचा उपयोग सायबर गुन्हयांना प्रतिबंध करण्याकरीता होणार आहे.

## कांदा निर्यातीवरील शुल्क रद्द करा; दिलीप माने यांची शासनाकडे मागणी

सोलापूर/प्रतिनिधीः केंद्र शासनाने कांदा निर्यातीवर लागू केलेले ४० टक्के शुल्क रद्द करून आर्थिक अडचणीतील शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी माजी आमदार दिलीप माने यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्यामार्फत सरकारकडे निवेदनाद्वारे केली आहे. गेल्या डिसेंबरमध्ये केंद्र सरकारने कांदा निर्यातबंदी करून शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे.

आता काही अंशी निर्यातबंदी उठविली असली तरी निर्यात करण्यात येणाऱ्या कांद्यावर ४० टक्के शुल्क लावले आहे. निर्यात शुल्क अधिक असल्याने व्यापारी कांदा निर्यात करीत नाहीत. याचा परिणाम शेतकऱ्यांवर होत आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वात मोठे कांदा पिकवणारे राज्य असून भारतातील एकूण कांदा उत्पादनात महाराष्ट्राचा ३३ टक्के वाटा आहे. शिवाय राज्यातील कांद्याची गुणवत्ता चांगली असल्यामुळे निर्यातीमध्ये महाराष्ट्र आघाडीवर आहे. राज्यात सोलापूर, नाशिक, पुणे, सातारा, नगर, धुळे, बुलडाणा, जळगाव हे जिल्हे कांदा उत्पादनासाठी प्रसिध्द आहेत. त्यामध्ये सोलापूर, नाशिक हे अव्वलस्थानी आहेत. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती व लासलगाव बाजार समिती या बाजार समित्या आशिया खंडात प्रसिध्द बाजारपेठ आहेत.

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये दरवर्षी सुमारे ११५० कोटींची आर्थिक उलाढाल होते. केंद्र शासनाने कांदा निर्यातीवर सुरुवातीला १९ ऑगस्ट २०२३ रोजी ४० टक्के निर्यात शुल्क लागू करून ७ डिसेंबर २०२३ पासून संपूर्ण कांदा निर्यातबंदी केली. त्यानंतर केंद्र शासनाने ४ मे २०२४ रोजी कांदा निर्यातीसाठी ५५० मे.टन एम.ई.पी. लागू केली. हा शेतकरी विरोधात निर्णय असल्याने कांदा उत्पादक शेतकरी, संघटनांमध्ये प्रचंड असंतोष आहे. महाराष्ट्रात उत्पादित होणारा कांदा, त्याची गुणवत्ता याचा विचार करून उन्हाळी व रब्बी कांदा जास्तीत जास्त प्रमाणात परदेशात निर्यात होण्यासाठी केंद्र शासनाने निर्यातीवर लागू केलेले ४० टक्के शुल्क रद्द करण्यात यावे, असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी उत्तर सोलापूर, दक्षिण सोलापूर तालुक्यातील शेतकरी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ग्रामीण गुन्हे शाखेकडून चोरट्याला अटक; १५ दुचाकी जप्त केल्या



सोलापूर/प्रतिनिधीः ग्रामीणच्या स्थानिक गुन्हे शाखेने एका चोरट्याला अटक करुन त्याच्याकडून सुमारे पाच लाखांच्या १५ दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. नामदेव बबन चुनाडे (वय ५१, रा. अनिलनगर, झोपडपट्टी, पंढरपूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथक गस्त घालत असताना कुर्डुवाडी येथून चोरीस गेलेली मोटारसायकल घेऊन एक इसम विक्रीसाठी तीन रस्ता चौक, पंढरपूर येथे येणार असल्याचे समजले. त्यानुसार पथकाने तो चोरटा मोटारसायकलवरुन येताच त्यास ताब्यात घेतले. त्यास ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता त्याच्याजवळची मोटारसायकल त्याने कुर्डुवाडी येथून चोरी केल्याची कबुली दिली. तसेच त्याच्याकडे पथकाने सखोल तपास केला असता त्याने सोलापूर, अहमदनगर, पुणे, धाराशिव व कोल्हापूर येथून चोरलेल्या अन्य १४ मोटारसायकली त्याच्या घराच्या पाठीमागील पडक्या जागेत लपवून ठेवल्या होत्या त्या हस्तगत केल्या आहेत.

मोहोळ, अकलूज, फौजदार चावडी (सोलापूर शहर), हडपसर, भारती विद्यापीठ पुणे, तामलवाडी (धाराशिव), मिरजगाव (नगर), जयसिंगपूर (कोल्हापूर), व अन्य सहा ठिकाणांहून त्याने दुचाकी चोरल्याचे स्पष्ट झाले आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक शिरीष सरदेशपांडे, अपर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर, पोलीस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक नागनाथ खुणे, पोलीस उपनिरीक्षक सुबोध जमदाडे, पोलीस उपनिरीक्षक रविराज कांबळे, श्रीकांत गायकवाड,

महंमद इसाक मुजावर, पोलीस अंमलदार सलीम बागवान, विजयकुमार भरले, रवी माने, धनराज गायकवाड, अन्वर अत्तार, सूरज रामगुडे, विनायक घोरपडे, सतीश बुरकुल यांनी केली.

## सोलापुरात पावसाची हजेरी

सोलापूर/प्रतिनिधीः शहर व जिल्ह्याच्या काही भागात गुरुवारी सायंकाळी पावसाने हजेरी लावली. या पावसाने शहरात सखल भागात मोठ्या प्रमाणात पाणी साचले. गुरुवारी सकाळपासून चांगलाच उकाडा जाणवत होता. सायंकाळी साडेचारच्या सुमारास अचानक आकाशात ढगांची दाटी होऊन पावसाला सुरुवात झाली. अर्धा तासाहून अधिक वेळ कमी अधिक प्रमाणात पावसाच्या सरी कोसळत होत्या. या पावसामुळे शहरातील सखल भागात पाणी साचले होते. त्यातूनच वाहनधारकांना मार्गक्रमण करावे लागले. नागरिकांना मात्र रेनकोट, छत्री, पावसाळी टोप्या आदींचा वापर करावा लागला. या पावसामुळे हवेत गारवा निर्माण झाला. दिवसभराच्या पावसामुळे शहराच्या हद्दवाढ भागात नागरिकांना चिखलातून मार्ग काढावा लागला. निसरड्या रस्त्यावरून जात असताना अनेक ठिकाणी दुचाकी घसरत होत्या.

## सम्राट चौक ड्रेनेजलाइनची कारंजे यांनी केली पाहणी

सोलापूर/प्रतिनिधीः बुधवार पेठ परिसरातील श्राविका चौक ते सम्राट चौकमार्गे जुना कारंबा नाका येथील ड्रेनेजलाइन वेळोवेळी तुंबते. तातडीने महापालिकेने कार्यवाही करावी अशी मागणी माजी गटनेते आनंद चंदनशिवे यांनी केली होती. या संदर्भात गुरुवारी महापालिका अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी येथील ड्रेनेजलाइनची पाहणी करून कार्यवाहीचे आदेश दिले. या परिसरातील ड्रेनेजलाइन सातत्याने तुंबली जाते, अशी तक्रार येथील नागरिकांनी आनंद चंदनशिवे यांच्याकडे केली होती. त्यानंतर चंदनशिवे यांनी महापालिका आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे कार्यवाहीची मागणी केली होती. दरम्यान, अतिरिक्त आयुक्त कारंजे यांनी या परिसरातील ड्रेनेजलाइनची पाहणी केली. तातडीने मोठ्या व्यासाची ड्रेनेजलाइन टाकण्यासंदर्भात निर्णय घेण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी महापालिकेचे सार्वजनिक आरोग्य अभियंता व्यंकटेश चौबे, सहायक अभियंता रामचंद्र पेंटर, विभागीय अधिकारी प्रकाश सावंत, अवेक्षक श्याम कन्ना, चंद्रकांत सोनवणे, अविनाश भडकुंबे, मोहन जमदाडे, अमोल इंगळे, बसू मेंडके आदींसह नागरिक उपस्थित होते.

## ऑनलाइनसह रोख स्वरुपात कर भरण्याच्या सुविधेचा लाभ घ्यावा

सोलापूर/प्रतिनिधीः महापालिका मिळकतकराची बिले महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली आहेत. मिळकतदारांना क्यूआर कोड, ऑनलाइनसह रोख स्वरूपात कर भरता येणार आहे. या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिका आयुक्त शीतल तेली–उगले यांनी केले आहे.सोलापूर महानगरपालिका मालमत्ता कर विभागकडील २०२४–२५ या आर्थिक वर्षाची मालमत्ता कराची बिले ऑनलाइन पध्दतीने मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. थकबाकीसह २०२४–२५ या आर्थिक वर्षाचे मिळकतकर



ऑनलाइन व रोख स्वरुपात भरण्याची सुविधा हुतात्मा स्मृती मंदिर येथील काउंटरवर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. ऑनलाइन पध्दतीने कर भरण्याकरिता https://smccity.solapurcorporation.org/counteršreceiptšonline.aspx ही लिंक ओपन करुन मिळकतकर भरता येईल. मिळकतकर भरण्याकरिता क्यूआर कोडने भरण्याचीही सुविधा कार्यान्वित करण्यात आलेली आहे. अद्याप छापील बिले प्राप्त होण्यास काही कालावधी लागणार असल्याने लिंक उघडून त्यामध्ये आपला मिळकत क्रमांक नमूद करून, २०२४–२५ या आर्थिक वर्षातील मिळकतकर ऑनलाइन पध्दतीने तसेच क्यूआर कोड स्कॅन करुन सर्व प्रकारचे डेबिट व क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग अथवा यूपीआयद्वारे भरु शकतील, असेही आयुक्तांनी सांगितले.